# The launch of Crimson and Champion LED strip light
# Coverage: **aaplerajya.com**

*Date : November 2020*

[http://bit.ly/3va4dVl](http://bit.ly/3va4dVl)




Whatsapp | Facebook | Twitter

*दिवाळी साजरी करण्यासाठी अगदी सोयीस्कर व सुलभ स्ट्रिप लाईट्स*

**मुंबई, ०३ नोव्हेंबर, २०२०** - गोल्डमेडल इलेक्ट्रिकल्स या संपूर्णपणे भारतीय व 'फास्ट मुव्हिंग इलेक्ट्रिकल गुड्स' (एफएमइजी) क्षेत्रातील कंपनीने सध्याच्या उत्सवासाठी 'क्रिमसन' आणि 'चॅम्पियन' असे दोन नवे 'एलईडी स्ट्रिप लाइट्स' सादर केले आहेत. यंदा उत्सव घरातच साजरा करणे अपरिहार्य बनल्यामुळे क्रिमसन व चॅम्पियन एलईडी पट्टी दिवे हे घराच्या सजावटीमध्ये सुरक्षित व सुलभ प्रकाशयोजनेसाठी योग्य ठरणार आहेत. या दिव्यांच्या सादरीकरणाबरोबरच, उत्कृष्ट तंत्रज्ञान व डिझाईन असलेले व घरगुती उपयोगाचे 'अॅक्सेंट लाईटिंग', 'बॅक लाईटिंग' आणि सजावटीचे लाईटिंग हे प्रकारही कंपनी सादर करीत आहे.

'गोल्डमेडल'चे 'क्रिमसन' व 'चॅम्पियन 'एलईडी पट्टी दिवे हे पातळ, लवचिक आणि शॉक-प्रतिरोधक आहेत, त्यामुळे ते डेस्क, वर्क स्टेशन, शेल्फ आणि अगदी जिन्यावर किंवा जिन्याखालीही सुरक्षितपणे वापरता येतात. प्रति मीटर किमान 60 एलईडी आणि प्रति एलईडी 20 ल्युमेन असे स्वरूप असलेले हे पट्टी दिवे विजेचा वापर कमी करून तसेच कमी उष्णता निर्माण करूनही चमकदार प्रकाश देतात. ते लावताना वेळ, श्रम व पैसे यांची बचत होते. त्यामुळे चांगली प्रकाशव्यवस्था हवी असणाऱ्या कोणत्याही प्रसंगी ते उपयुक्त ठरतात. उच्च कार्यक्षमता आणि टिकाऊपणा यांच्याबाबतीत हे नवीन एलईडी पट्टी दिवे गुणवत्तेचे मापदंड निश्चित करतात.